# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.05.2025** **वारःशनिवार**

---

1. भारतीय सैन्याकडून जम्मूजवळील पाकिस्तानी चौक्या आणि दहशतवादी लाँच पॅड उद्‌ध्वस्त; पाकिस्तानच्या ड्रोन हल्ल्यांची मालिका यशस्वीपणे उधळली
2. पंतप्रधानांनी काल घेतली उच्चस्तरीय बैठक
3. येत्या 15 मे पर्यंत उत्तर आणि पश्चिम भारतातील 32 विमानतळ सर्व नागरी उड्डाणांसाठी बंद आणि
4. बँकिंग सेवांसंदर्भात सतर्क राहण्याच्या अर्थमंत्र्यांच्या सूचना

**<u>ड्रोन 1</u>**

भारतीय सैन्याने जम्मूजवळील पाकिस्तानी चौक्या आणि दहशतवादी लाँच पॅड उद्‌ध्वस्त केली आहेत. या ठिकाणांवरून ट्यूब-लाँच प्रकारचे ड्रोन सोडले जात होते. याशिवाय भारतीय संरक्षण यंत्रणेने काल रात्री बारामुल्ला ते भुज पर्यंत आंतरराष्ट्रीय सीमा आणि पाकिस्तान सोबत असलेल्या नियंत्रण रेषेवरच्या 26 ठिकाणी पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हल्ल्यांची मालिका यशस्वीपणे उधळून लावली आहे.

यामध्ये नागरी आणि लष्करी स्थळांना संभाव्य धोका निर्माण करणाऱ्या संशयित सशस्त्र ड्रोन्सचा समावेश आहे. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बारामुल्ला, श्रीनगर, अवंतीपोरा, नागरोटा, जम्मू, फिरोजपूर, पठाणकोट, फाजिल्का, लालगड जट्टा, जैसलमेर; बारमेर, भुज, कुअरबेट आणि लाखी नाला या ठिकाणी हे ड्रोन आढळून आले आहेत.

याबाबत भारतीय सशस्त्र दलांनी अधिक सतर्कता बाळगली आहे. अशा सर्व हवाई धोक्यांचा मागोवा ड्रोन-विरोधी प्रणालीचा वापर करून घेतला जात आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार त्वरित कारवाईही केली जात आहे. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना घरात राहण्याचा, अनावश्यक हालचाली मर्यादित ठेवण्याचा आणि स्थानिक अधिकाऱ्यांनी दिलेल्या सुरक्षा सूचनांचं काटेकोर पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पंजाबमधील फिरोजपूर, अमृतसर आणि पठाणकोटसह सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये या सशस्त्र ड्रोनने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय संरक्षण दलांनी हे प्रयत्न यशस्वीरित्या हाणून पाडले. दरम्यान फिरोजपूरमध्ये मात्र एका घराचं नुकसान झालं आणि हल्ल्यात तीन जण जखमी झाले आहेत.

दरम्यान, बदलत्या परिस्थितीबाबत माहिती देण्यासाठी आज सकाळी 10 वाजता नवी दिल्लीत एका विशेष पत्रकार परिषदेचं आयोजन केलं जाण्याची शक्यता आहे.

**<u>ड्रोन 2</u>**

पाकिस्तानने गुरुवारी रात्री लेह ते सिरक्रीक पर्यंत सुमारे 400 ड्रोन वापरून 36 ठिकाणी घुसखोरीचा प्रयत्न केला होता. भारतीय सशस्त्र दलांनी यापैकी अनेक ड्रोन कायनेटिक आणि नॉन-कायनेटिक पद्धतीने पाडले. पाकिस्तानी

सैन्याने लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याच्या हेतूने संपूर्ण पश्चिम सीमेवर अनेक वेळा भारतीय हवाई हद्दीचं उल्लंघन केल्याची माहिती काल नवी दिल्लीत झालेल्या एका विशेष पत्रकार परिषदेत भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली. याशिवाय पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर ताकदीची शस्त्र वापरुन गोळीबार केला असंही कुरेशी यांनी सांगितलं. हवाई संरक्षण प्रणालींची चाचणी करत गुप्त माहिती गोळा करण्याचा या मोठ्या हवाई घुसखोरीचा उद्देश होता असं त्या म्हणाल्या. ड्रोनच्या अवशेषांची फॉरेन्सिक तपासणी केली जात असून प्राथमिक अहवालानुसार ते तुर्की असिसगार्ड सोंगर बनावटीचे ड्रोन असल्याचं त्यांनी सांगितलं.

विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याकरता, पाकिस्तानमधील 4 हवाई संरक्षण स्थळांवर भारतीय सशस्त्र ड्रोन सोडण्यात आले आणि त्यापैकी एक ड्रोन एडी रडार नष्ट करण्यात यशस्वी झाला. पाकिस्तानने नियंत्रण रेषेवर मोठ्या ताकदीच्या तोफा आणि सशस्त्र ड्रोनचा वापर करून मारा केल्यामुळे भारतीय लष्कराचे काही जवान जखमी झाले. भारताच्या प्रत्युत्तरात पाकिस्तानी सैन्याचंही मोठं नुकसान झाल्याचं सिंग यांनी सांगितलं.

शाळा, गुरुद्वारा आणि मंदिरांसह प्रार्थनास्थळांना लक्ष्य करून गोळीबार केल्याबद्दल त्यांनी पाकिस्तानची निंदा केली आणि हा पाकिस्तानच्या वागणूकीची नीच पातळी असल्याचं मिस्री यांनी म्हटलं आहे. बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदच्या मुख्यालयावर झालेला हल्ला हा निर्घृणपणे हत्या करण्यात आलेल्या वॉल स्ट्रीट जर्नल पत्रकार डॅनियल पर्ल यांच्या क्रूर हत्येला योग्य प्रतिसाद असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान एका प्रश्नाच्या उत्तरात पुढील निर्देश मिळेपर्यंत कर्तारपूर साहिब कॉरिडॉर सेवा स्थगित करण्यात आल्या आहेत असं त्यांनी सांगितलं.

**<u>पंतप्रधान</u>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल एक उच्चस्तरीय बैठक झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, सरसेनाध्यक्ष आणि तीनही सशस्त्र दलांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. त्याचबरोबर पंतप्रधानांनी काल माजी लष्करप्रमुख, माजी हवाईदल आणि नौदल प्रमुख तसंच सैन्य दलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही भेट घेतली. यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीबाबत सविस्तर चर्चा केली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकंदर सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला.

**<u>विमानसेवा</u>**

नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन नागरी विमान उड्डाणं सुरु झाल्याचं वृत्त आहे. भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रवासासंदर्भातील सुरक्षेच्या सर्व मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्याची माहिती विमानतळ प्राधिकरणानं दिली आहे. विमानसेवेचं कामकाज सामान्य असलं तरी, बदलत्या हवाई परिस्थितीमुळे उड्डाणवेळापत्रकांवर परिणाम होऊ शकतो आणि सुरक्षेसंदर्भातील प्रक्रियेला जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांनी संबंधित विमानकंपनीच्या सूचनांचं पालन करावं, प्रवासातील सामानाचे नियम पाळावेत, सुरक्षा तपासणीत संभाव्य विलंबासाठी विमानतळावर लवकर पोहोचावं आणि संरक्षणविषयक सुरळीत प्रक्रियेसाठी सुरक्षा कर्मचाऱ्यांना सहकार्य करावं असा सल्ला विमानतळ प्राधिकरणानं दिला आहे.

**विमानसेवा**

दरम्यान भारतीय विमानतळ प्राधिकरणाने 15 मे पर्यंत उत्तर आणि पश्चिम भारतातील 32 विमानतळ सर्व नागरी उड्डाणांसाठी तात्पुरते बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. यात अमृतसर, चंदीगड, जम्मू, श्रीनगर, भुज, जामनगर; जैसलमेर, पठाणकोट आणि अन्य प्रमुख विमानतळांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, दिल्ली आणि मुंबई उड्डाण क्षेत्रांमधील हवाई वाहतूक सेवेचे 25 एटीएस विभागही या कालावधीत बंद राहतील.

**सीतारामन**

बँकिंग आणि वित्तीय सेवा अखंड आणि अविरत सुरू राहाव्यात म्हणून कोणत्याही संकटाला किंवा परिस्थितीला तोंड देण्यासाठी पूर्णपणे सावध आणि सज्ज राहण्याचे निर्देश केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांनी सर्व बँकांना दिले आहेत. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील बँका आणि विमा कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत काल झालेल्या बैठकीत, आव्हानात्मक काळात आर्थिक स्थिरता निश्चित करण्यात बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर त्यांनी भर दिला.

**अन्नसाठा**

देशात पुरेसा अन्नसाठा असल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत शांत राहण्याचं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं आहे. यंदा भरघोस उत्पादन झालं असून आगामी पिकांसाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं त्यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना सांगितलं.

**रेल्वे**

भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे कामकाजासाठी केलेल्या व्यवस्थेचा आढावा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतला आहे. रेल्वे अधिकाऱ्यांना विविध सरकारी संस्थांशी समन्वय साधून सीमावर्ती भागातील लोकांना मदत करण्यासाठी नियमित रेल्वे गाड्यांसोबतच, आवश्यकतेनुसार विशेष रेल्वे गाड्या सोडण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**सोनोवाल**

केंद्रीय बंदरे आणि जहाज बांधणी मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सागरी व्यावसायिक प्रकल्पांचा आढावा घेतला आणि या संवेदनशील काळांत व्यापारावर काही परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**गुजरात**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, गुजरातमध्ये, राज्य सरकार आरोग्य सुविधांची उपलब्धता, जीवनावश्यक वस्तूंचा पुरेसा पुरवठा आणि सीमावर्ती भागातल्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक खबरदारीच्या उपाययोजना करत आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी काल रात्री राज्य आपत्कालीन केंद्रामध्ये उच्चस्तरीय बैठक घेऊन सीमावर्ती जिल्ह्यांमधील परिस्थितीचा आढावा घेतला.

**भारत न्यूझीलंड**

भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार वाटाघाटींचा पहिला टप्पा काल नवी दिल्लीत यशस्वीपणे पूर्ण झाला. द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक सहभाग वाढविण्याच्या दिशेनं टाकलेलं हे एक मोठं पाऊल असल्याची माहिती वाणिज्य

आणि उद्योग मंत्रालयाने दिली. चर्चेच्या पहिल्या फेरीत दोन्ही देशांदरम्यान अनेकदा दूरस्थ पद्धतीने चर्चा झाल्यानंतर काल प्रत्यक्ष बैठक झाली.

**<u>नाणेनिधी</u>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी मंडळाच्या बैठकीत पाकिस्तानसाठी बेलआउट पॅकेजमधून नव्या मदतीचा विचार करण्यात आल्यावर भारताने मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. ला.

**<u>क्रिकेट</u>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वर्तमान आयपीएल हंगामातील उर्वरित सामने एका आठवड्यासाठी तत्काळ स्थगित करण्याची घोषणा केली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.